CIDCO
WE MAKE CITIES

प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE

सिडको
शहरांचे शिल्पकार

CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
**Regd. Office:** Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-5650 0900; Fax: 91-22-5650 0933; www.cidcoindia.com
**Head Office:** CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: ninawe.mb@cidcoindia.com

दि. ६-०६-२००९

# सिडको कार्यालयात महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा

सिडकोच्या सीबीडी बेलापूर, नवी मुंबई येथील कार्यालयात दि. १ मे २००९ रोजी महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ४९वा वर्धापन दिन सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक श्री. जी. एस. गिल्ल यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या सोहळ्यास सहव्यवस्थापकीय संचालक श्री. दिलीप जी. जाधव हे प्रामुख्याने उपस्थित होते.

या प्रसंगी सिडको सुरक्षा दल आणि अग्निशमन दलाच्या शिस्तबद्ध संचलनात राष्ट्रध्वजाला मानवंदना देण्यात आली. या सोहळ्याला सिडकोचे सर्व विभागप्रमुख, अधिकारी व कर्मचारी यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती लाभली.

नवीन औरंगाबाद व वाळूज येथील सिडको कार्यालयात महाराष्ट्र दिन साजरा सिडकोच्या नवीन औरंगाबाद येथील कार्यालयातही महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी मुख्य प्रशासक (नवीन शहरे) श्री. मनोहर भगत यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या सोहळ्याला प्रशासक (नवीन शहरे) श्रीमती मनिषा जायभाये आणि अधिकारी व कर्मचाऱ्यांची उपस्थिती लाभली.

तसेच वाळूज महानगर येथील सिडको कार्यालयातही कार्यकारी अभियंता श्री. एन.सी. बायस यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या सोहळ्यालाही वाळूज महानगर सिडकोचे अधिकारी व कर्मचारीही मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

कृपया वरील वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून / माध्यमातून ठळक प्रसिद्धी द्यावी, ही विनंती

कळावे

**(डॉ. मोहन निनावे)**
जनसंपर्क अधिकारी, सिडको

प्रति ____________________

____________________